# भारतीय जीवन बीमा निगम

# LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## प्रधान मंत्री जन धन योजना

## के तहत जन-धन खाताधारकों

## के लिये रु.30,000/- के

## जीवन बीमा सुरक्षा के

## दावा निपटारा हेतु प्रक्रिया

# PRADHAN MANTRI JAN DHAN YOJANA (PMJDY)

## PROCEDUREFOR CLAIM SETTLEMENT

## UNDER LIFE INSURANCE COVER OF

## Rs.30,000/- FOR PMJDY ACCOUNT HOLDER

**<u>प्रधान मंत्री जन धन योजने</u>**

**<u>अंतर्गत बँकांसाठी दावा प्रक्रियण प्रक्रिया</u>**

**_______________/ अनुक्रमणिका**


A. प्रस्तावना

B. व्याख्या

C. योजनेअंतर्गत लाभ

D. मुलभूत पात्रता शर्ती

E. अपात्रता श्रेणी

F. योजनेतून निर्गमन

G. दावा पूर्ती प्रक्रिया

H. मृत्यू दाव्यासाठी सूचना मिळाल्यावर बँकांनी पालन करण्याच्या प्रक्रिया

I. मृत्यू दाव्यासाठी सूचना मिळाल्यावर एलआयसीने पालन करण्याच्या प्रक्रिया

J. परिशिष्ठांची यादी

# <u>पीएमजेडीवाय दावा प्रक्रिया</u>

## A. <u>प्रस्तावना</u>

माननीय पंतप्रधानांनी 15 ऑगस्ट 2014 च्या स्वातंत्र्य दिनाच्या आपल्या भाषणामध्ये, अगदी प्राथमिक वित्तिय सेवांपासूनही सध्या वंचित असलेल्या लोकांची मोठी संख्या डोळ्यासमोर ठेवून वित्तीय समावेशनाचा एक सर्वसमावेशक कार्यक्रम जाहीर केला. प्रधान मंत्री जन धन योजना (पीएमजेडीवाय) ही अशा प्रत्येक कुटुंबांसाठी मुलभूत खाते प्रदान करण्यासाठी आहे ज्यांचे आत्तापर्यंत खातेच नव्हते. या बँक खात्यामध्ये एक रुपे डेबिट कार्ड आहे ज्यामध्ये रु. 1 लाखांचे अंगभूत अपघाती छत्र आहे.

28.08.14 रोजी नवी दिल्लीमध्ये पीएमजेडीवाय योजनेचा प्रारंभ करताना माननीय पंतप्रधानांनी 15 ऑगस्ट 2014 ते 26 जानेवारी 2015 या कालावधीमध्ये पहिल्यांदा बँक खाते उघडणाऱ्या सर्वांसाठी रुपे कार्डसह रु. 30,000/- चे जीवन छत्र जाहीर केले.

या रु. 30,000/- च्या जीवन विमा संरक्षणास **प्रधान मंत्री जन धन योजने अंतर्गत जीवन छत्र** म्हणले जाते, ज्यामुळे विमाबध्द व्यक्तीचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास, पिडीत कुटुंबाला जीवन विम्याचे छत्र मिळेल. शहरी गरीब आणि ग्रामीण गरीब या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या ज्या कुटुंबांना थेट विमा घेणे परवडत नाही आणि ज्यांचा कोणत्याही सामाजिक सुरक्षितता योजनेमध्ये समावेश नाही त्यांना सुरक्षा देण्याचे या योजनेचे लक्ष्य आहे.

## B. <u>व्याख्या</u>

| | | |
|---|---|---|
| पीएमजेडीवाय | - | प्रधान मंत्री जन धन योजना |
| एचओएफ | - | हेड ऑफ फॅमिली (कुटुंब प्रमुख) |
| रुपे कार्ड | - | पीएमजेडीवाय अंतर्गत उघडलेल्या बीएसबीडीए खात्यासह जारी केलेले डेबिट कार्ड |
| आधार कार्ड | - | युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (युआयडीएआय) द्वारे जारी केलेले बायो-मेट्रिक कार्ड |
| आयकर अधिनियम, 1961 | - | आयकर अधिनियम, 1961, भारत सरकार |
| आम आदमी बिमा योजना (एएबीवाय) | - | भारत सरकारची सामाजिक सुरक्षा योजना, वित्तपुरवठा मंत्रालय जे मृत्यू झाल्यास रु. 30,000/- चे आणि अपघाती मृत्यू झाल्यास कायमस्वरूपी आणि आंशिक अपंगत्व लाभांव्यतिरिक्त रु.75,000/- चे जीवन छत्र प्रदान करते. |
| एएबीवायचे 48 व्यवसाय | - | एएबीवाय जीवन छत्र परिशिष्ठ ए मध्ये सूचीबद्ध केलेल्या 48 व्यवसायांतील लोकांना प्रदान केले जाते. |

| | | |
|---|---|---|
| मुलभूत पात्रता शर्ती | - | पीएमजेडीवाय अंतर्गत पात्र होण्यासाठी ज्यांची पूर्तता करणे आवश्यक आहे अशा शर्ती |
| एपीबीएस | - | आधार पेमेंट ब्रिज सिस्टिम |
| बायो-मेट्रिक कार्ड | - | आधार कार्ड किंवा योग्य अधिकाऱ्याद्वारे जारी केलेले कोणतेही कार्ड जे पीएमजेडीवाय अंतर्गत बीएसबीडीए खाते उघडण्यासाठी बँकेत स्वीकार्य आहे. |

## C. <u>योजनेअंतर्गत लाभ</u>

ही योजना रु. 30,000/- चे जीवन छत्र प्रदान करते जे कोणत्याही कारणाने लाभार्थीचा मृत्यू झाल्यास देय आहे, पात्रता शर्तींची पूर्तता करण्याच्या आधीन:

## D. <u>मुलभूत पात्रता शर्ती</u>

i. 15-08-14 ते 26-01-15 कालावधी दरम्यान किंवा भारत सरकारद्वारे विस्तारित केलेल्या अतिरिक्त कालावधीमध्ये अतिरिक्त रुपे कार्डसह पहिल्यांदा बँक खाते उघडणारी व्यक्ती.

ii. हा व्यक्ती सहसा कुटुंब प्रमुख किंवा कुटुंबातील कमावता सदस्य असावा आणि 18 ते 59 वयोगटातील असावा (अर्थात हा व्यक्ती किमान 18 वर्षांचा असावा आणि वयाची 60 वर्षे पूर्ण केलेला नसावा). जर कुटुंब प्रमुख 60 वर्षे किंवा अधिक वयाचा असेल तर, वर नमूद केलेल्या वयोगटामध्ये बसणाऱ्या दुसऱ्या क्रमांकाच्या कमावत्या व्यक्तीला छत्र दिले जाईल, पात्रतेच्या आधीन.

iii. त्या व्यक्तीचे रुपे कार्ड आणि बायो-मेट्रिक कार्ड बँक खात्याशी संलग्न असावे किंवा जर संलग्न नसेल तर बँक खात्याशी संलग्न होण्याच्या प्रक्रियेत असावे.

iv. लहान खात्यांसह कोणत्याही बँक खात्यातील खाते असावे.

v. छत्र प्रभावी होण्यासाठी वरील रुपे कार्ड वैध असावे आणि सदस्याच्या मृत्यूच्या वेळी अंमलात असावे

vi. बिमा योजनेमध्ये कुटुंबातील केवळ एका व्यक्तीला छत्र मिळेल आणि जर त्या व्यक्तीकडे अनेक कार्ड्स/खाती असतील तर केवळ एकाच कार्ड अंतर्गत लाभांना परवानगी दिली जाईल अर्थात प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला रु. 30,000/- चे एकल छत्र मिळेल, पात्रता शर्तींच्या आधीन.

vii. योजने अतंर्गत रु. 30,000/- चे जीवन छत्र प्रारंभी 5 वर्षांच्या कालावधीसाठी असेल अर्थात वित्तीय वर्ष 2019-20 संपेपर्यंत. त्यानंतर, योजनेचे पुनरावलोकन केले जाईल आणि विमाबध्द व्यक्तीने भविष्यात

हप्ता प्रदान करण्याच्या समस्येसह ती पुढे चालू ठेवण्याच्या अटी व शर्ती त्यानंतर जशा अनुरूप असतील तशा ठरवल्या जातील.

viii. जर पीएमजेडीवाय खाते संयुक्त असेल तर, पहिला खातेदार अर्थात प्राथमिक खातेदार पात्रतेच्या शर्तींच्या आधीन छत्रासाठी पात्र असेल.

## E. <u>अपात्रता श्रेणी</u>

i. केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे कर्मचारी (सेवेत असलेले आणि निवृत्त) आणि त्यांची कुटुंबे.

ii. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, केंद्र सरकारच्या मालकीच्या कोणत्याही संस्था, राज्य सरकारच्या मालकीच्या कोणत्याही संस्था किंवा केंद्र सरकार व राज्य सरकारच्या संयुक्त मालकीच्या कोणत्याही संस्थांचे कर्मचारी (सेवेत असलेले आणि निवृत्त) आणि त्यांची कुटुंबे.

iii. ज्या व्यक्तींचे उत्पन्न आयकर अधिनियम 1961 अंतर्गत करपात्र असते किंवा जे वार्षिक इन्कम टॅक्स रिटर्न भरतात किंवा ज्यांच्या उत्पन्नातून टीडीएस वजा केला जात आहे त्या व्यक्ती आणि त्यांची कुटुंबे.

iv. आम आदमी बिमा योजनेमध्ये परिभाषित केलेले 48 व्यवसाय करणारे लोक आणि त्यांची कुटुंबे.

v. अन्यथा पात्र खातेदार, ज्यांना बँकेच्या इतर कोणत्याही योजनेअंतर्गत खात्यामध्ये जीवन छत्र आहे, ते दोन योजनांपैकी एकीची निवड करू शकतात आणि कोणत्याही एकातून लाभ मिळवू शकतात.

vi. योजनेच्या मुलभूत पात्रता शर्तींची पूर्तता न करणाऱ्या सर्व व्यक्ती.

## F. <u>योजनेतून निर्गमन</u>

या व्यक्ती 60 वर्षांच्या झाल्यावर योजनेतून बाहेर पडतील अर्थात ज्या दिवशी ती व्यक्ती 60 वय पूर्ण करते किंवा योजना बंद होते, जे आधी असेल ते.

## G. <u>दावा पूर्ती प्रक्रिया</u>

a) दाव्याची रक्कम रु. 30,000/- ही नामनिर्देशित व्यक्तीला(क्तींना)/ खातेदारांच्या कायदेशीर वारसांना देय असेल. जोखिम छत्र व्यक्तीच्या 18 वर्षे वयापासून (पूर्ण झालेली) ते वयाची 60 वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रदान केले जाईल अर्थात वयाची 60 वर्षे पूर्ण झाल्यावर पात्रता समाप्त होईल आणि त्यांनी वयाची 60 वर्षे पूर्ण केल्यावर ते योजनेतून बाहेर पडतील.

b) रु. 30000/- च्या मृत्यू दावा लाभाची एलआयसीच्या नियुक्त केलेल्या पेन्शन अँड ग्रुप स्कीम (पीअँडजीएस) कार्यालयामध्ये पूर्तता केली जाईल. योजनेचे खालीलप्रमाणे पालन केले जाईल:

i. परिशिष्ठ ब नुसार दाव्याची कागदपत्रे दावापूर्ती करण्यासाठी संबंधित बँकेच्या जिल्हा शाखा/मध्यवर्ती शाखेद्वारे एलआयसीने दावा प्रक्रियणासाठी नियुक्त केलेल्या पेन्शन अँड ग्रुप स्कीम (पीअँडजीएस) कार्यालयामध्ये सादर केली जातील. पीअँडजीएस युनिट्सची एक यादी परिशिष्ठ ड म्हणून सोबत जोडलेली आहे.

ii. बँक खात्यामध्ये नामनिर्देशित व्यक्तीला दाव्याची रक्कम अदा केली जाईल. नामनिर्देशन नसेल किंवा विमाबध्द व्यक्तीपूर्वी नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला किंवा नामनिर्देशित व्यक्ती ही जोडीदार, अपत्य किंवा पालक नसेल तर एलआयसीच्या विहित स्वरूपणामध्ये (परिशिष्ट सी1 आणि सी2 मध्ये दिले आहे) शीर्षकाचा कायदेशीर पुरावा देण्यासाठी खातेदाराच्या कायदेशीर वारसांनी क्षतीपूर्ती बंधपत्र सादर करावे.

iii. दाव्याची रक्कम नामनिर्देशित व्यक्तीच्या (क्तींच्या)/ कायदेशीर वारसांच्या बँक खात्यामध्ये एपीबीएसद्वारे जमा केली जाईल अर्थात आभार कार्ड क्रमांकाशी संलग्न असलेल्या खात्यामध्ये रक्कम जमा केली जाईल.

iv. जिथे दावेदाराने दाव्याचे प्रपत्र थेट एलआयसी कार्यालयामध्ये सादर केले आहे तिथे, संबंधित बँकेकडून आवश्यक सत्यापन इ. मिळविण्यासाठी एलआयसी कार्यालय ते प्रपत्र मृत खातेदाराच्या संबंधित बँकेकडे ते त्वरीत पाठवेल. संबंधित बँक शाखा दाव्याचे प्रपत्र दाव्याच्या प्रक्रियणासाठी एलआयसीच्या जवळच्या पीअँडजीएस युनिटकडे पाठवेल.

## H. <u>मृत्यू दाव्यासाठी सूचना मिळाल्यावर बँकांनी पालन करण्याच्या प्रक्रिया</u>

बँकेची संबंधित शाखा जिथे पीएमजेडीवाय बचत खाते प्रारंभी उघडले होते त्यांनी एलआयसीकडे दावा दाखल करणे आवश्यक आहे. दावा दाखल करताना, अग्रेषित करणाऱ्या बँक शाखेने पात्रता शर्तीनुसार दावा देय आहे का याची प्राथमिक तपासणी करावी. या उद्देशासाठी, पुढील कागदपत्रे मागवली जावी:-

1. मृत सदस्याच्या मृत्यू प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत.

2. मृत्यूच्या तारखेला खातेदाराचे वय ठरवण्यासाठी मृत व्यक्तीच्या आधार कार्डाची छायाप्रत. जर आधार कार्ड जारी केले नसेल तर <u>खालील वयाच्या पुराव्यांपैकी कोणतीही एक</u> सांक्षाकित केलेली छायाप्रत मागवली जाऊ शकते :-

   a) जन्म नोंदणीचा उतारा

   b) शालेय प्रमाणपत्राचा उतारा

   c) रेशन कार्ड

   d) मतदार ओळखपत्र

मृत्यूच्या तारखेपूर्वी जर मृत व्यक्तीच्या वयाची 60 वर्षे पूर्ण झाली असतील तर त्या व्यक्तीला जीवन विमा लाभ उपलब्ध नसतील. त्यामुळे, मृत्यूच्या तारखेचे वय महत्वाचे असते.

3. रुपे कार्डाच्या वैधतेचे आणि अंमलात असल्याचे सत्यापन (रुपे कार्ड ब्लॉक केले गेले आहे किंवा नाही ते तपासावे).

4. मृत व्यक्तीच्या बीपीएल कार्ड किंवा रेशन कार्डाच्या मदतीने 'कुटुंब प्रमुख' स्थितीचे आणि ती व्यक्ती कुटुंबातील कमावती व्यक्ती होती का याचे सत्यापन.

5. परिच्छेद इ मध्ये दिलेल्या अपात्रता शर्तीनुसार मृत व्यक्ती अपात्र नाही ना हे पडताळून पाहणे.

6. मृत व्यक्तीला बँकेतील खात्याशी संलग्न असे इतर कोणते जीवन विमा छत्र होते का हे पडताळून पाहणे कारण हा लाभ केवळ एकाच योजनेमध्ये प्रदान केला जाईल.

7. पीएमजेडीवाय अंतर्गत संयुक्त खातेदार असल्यास, पात्रता शर्तींच्या आधीन पहिल्या खातेदारास (प्राथमिक खातेदार) जीवन विमा छत्र प्रदान केले जाईल.

8. योग्य प्रकारे भरलेल्या दावा प्रपत्रासह डिस्चार्ज पावती (परिशिष्ठ बी मध्ये दिल्याप्रमाणे) :- दावा प्रपत्राचा भाग ए नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारस/ दावेदाराने भरावा. बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्याने भाग बी भरावा. भाग सी धील दावेदाराच्या स्वाक्षरीसाठी अधिकाऱ्याने साक्ष द्यावी. दाव्याच्या प्रपत्रावर बँकेचा शिक्का योग्य जागी मारलेला असावा. नामनिर्देशन नसेल किंवा विमाबध्द व्यक्तीपूर्वी नामनिर्देशित व्यक्तीचा मृत्यू झाला किंवा नामनिर्देशित व्यक्ती ही जोडीदार, अपत्य किंवा पालक नसेल तर एलआयसीच्या विहित स्वरूपणामध्ये (परिशिष्ट सी1 आणि सी2 मध्ये दिले आहे) शीर्षकाचा कायदेशीर पुरावा देण्यासाठी खातेदाराच्या कायदेशीर वारसांनी क्षतीपूर्ती बंधपत्र सादर करावे.

9. पूर्ण केलेले दावा प्रपत्र (भाग ए, बी आणि सी) खालील दस्तऐवजांसह एलआयसीच्या जवळच्या पीअँडजीएस युनिटकडे पाठवावे.

   a) मृत सदस्याच्या मृत्यू प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत.

   b) मृत व्यक्तीच्या आधार कार्डाची सांक्षाकित प्रत.

   c) दावेदाराच्या आधार कार्डाची सांक्षाकित प्रत.

वर नमूद केलेल्या सर्व दस्तऐवजांसह आमच्या पीअँडजीएस युनिटमध्ये दावा प्रपत्र प्राप्त झाल्यावर, पीअँडजीएस युनिट पात्रतेनुसार, आधारशी संलग्न असलेल्या बँक खात्यामध्ये मृत्यू दावा जमा करून नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसांच्या नावे दावापूर्ती करेल.

**I. <u>मृत्यू दाव्यासाठी सूचना मिळाल्यावर एलआयसीने पालन करण्याच्या प्रक्रिया</u>**

बँकांकडून दावा प्रपत्र प्राप्त झाल्यावर, आवश्यक ती इनवर्ड प्रक्रिया केल्यानंतर, पीअँडजीएस युनिटचा वापरकर्ता खालील पावले उचलतो:

1. दावा प्रपत्र सर्वप्रकारे भरलेले आहे आणि बँकेद्वारे सादर केलेल्या दस्तऐवजांच्या आधारे मृत व्यक्तीने पात्रता मापदंडाची पूर्तता केली आहे याचे सत्यापन करणे.

2. जर दावा अन्यथा देय असेल तर, वापरकर्ता पीएमजेडीवाय (प्रधान मंत्री जन धन योजना) साठीच्या दावा मोड्युलमध्ये लॉगिन करेल. मोड्युलमध्ये संबंधित डेटा एंटर केला जाईल.

3. दोन घटक तपासण्यासाठी मोड्युल सिस्टममध्ये क्वेरी निर्माण करेल.

    a) एकाच जीवनावर एकाहून अधिकवेळा दाव्याचे प्रदान करण्याचे टाळण्यासाठी त्याच जीवनावर आधी दावा अदा केला गेला आहे का.

    b) मृत व्यक्ती आम आदमी बिमा योजने अंतर्गतही समाविष्ट आहे का.

4. क्वेरी दोन डेटा बेसमधून आउटपुट निर्माण करेल जो एकतर सकारात्मक असेल किंवा नकारात्मक असेल.

5. जर आउटपुट सकारात्मक असेल तर, वापरकर्त्याने सत्यापन करण्यासाठी मोड्युलद्वारे नोंदींची यादी तयार निर्माण करण्यात येईल. व्यक्तिचलितपणे योग्य सत्यापन केल्यानंतर, जर अशी खात्री पटली की त्याच जीवनावर यापूर्वी दावा अदा केला नव्हता किंवा मृत व्यक्ती एएबीवाय अंतर्गत समाविष्ट नाही तर पर्यवेक्षकाने तसे प्रमाणित करावे. पर्यवेक्षकाने प्रमाणित केल्यावर, वापरकर्ता दावापूर्तीची प्रक्रिया करू शकतो.

6. वरील प्रक्रियेमुळे पीएमजेडीवाय आणि एबीबीवाय अंतर्गत डुप्लिकेट दाव्याची पूर्तता केली न जाण्याची शक्य तितकी खात्री होते. डुप्लिकेशन होऊ नये यासाठी मृत व्यक्तीचा तसेच दावेदाराचा आधार कार्ड क्रमांक वापरला जाईल.

7. जर आउटपुट नकारात्मक असेल तर, मोड्युल दावा पूर्तता करण्यासाठी वापरकर्त्याला पुढे जाऊ देईल.

दावा प्रदानाची नोंदणी पुस्तके आणि नोंदी एएबीवाय दाव्यांसाठी राखल्या गेलेल्या पध्दतीनेच राखली जातील. डीएबी आणि अपंगत्व लाभ पीएमजेडीवाय अंतर्गत देय नसल्यामुळे, संबंधित रकाने वगळावे.

**J.** दावा प्रपत्र येथून डाउनलोड करता येईल www.licindia.in, www.iba.org.in, http://financialservices.gov.in, www.nic.in.

**K. <u>परिशिष्ठांची यादी</u>**

| | | |
|---|---|---|
| परिशिष्ठ ए | - | आम आदमी बिमा योजने अंतर्गत 48 व्यवसायांची सूची |
| परिशिष्ठ बी | - | एलआयसीच्या दावा प्रपत्रासह डिस्चार्ज पावती. |
| परिशिष्ठ सी1 | - | शीर्षकाचा कायदेशीर पुरावा देण्यासाठी अर्ज प्रपत्र. |
| परिशिष्ठ सी2 | - | शीर्षकाचा कायदेशीर पुरावा देण्यासाठी क्षतीपूर्ती बंधपत्राचा एलआयसीचा फॉरमॅट. |
| परिशिष्ठ डी | - | दावा प्रपत्रे सादर करण्यासाठी पीअँडजीएस युनिट्सची यादी. |